नि.दि.मु.क्र. १०७/२०१८
विलास व इतर वि. विश्‍वास व इतर
नि. ५

## :: आ दे श ::

१. अर्ज वाचला, नि. १८ वरील प्रतिवादींचा जबाब वाचला. प्रस्तुत अर्ज जुन २०१८ मध्ये दाखल झालेला आहे. प्रतिवादींनी डिसेंबर २०१८ मध्ये या अर्जावर त्यांचा जबाब दाखल केला आहे. डिसेंबर २०१८ पासुन हा अर्ज युक्तीवादा करीता प्रलंबित होता. वादींना वारंवार संधी देवुनही वादी युक्तीवाद करत नसल्यामुळे दि. ३०.०९.२०१९ रोजी या अर्जावर आदेश पारीत करुन वादींचा युक्तीवादाचा अधिकार काढुन घेण्यात आलेला आहे. त्यामुळे प्रतिवादींचे म्हणणे ऐकुन गुणवत्तेवर हा अर्ज निकाली काढण्यात येत आहे. प्रतिवादीं करीता ॲड. आर. एच. कदम यांचा युक्तीवाद ऐकला.

२. मौजे बावधन तालुका वाई येथील शेत जमिन गट क्र. ३०३, जुना सर्वे क्र. ७४/२अ + २ब/१, क्षेत्रफळ १ हे. १० आर या मिळकती बाबत वादींनी कायम मनाई हुकूम आदेश त्यांचे हक्कात पारीत करणे करीता हा दावा दाखल केलेला आहे. प्रस्तुत दाव्याचा अंतिम निकाल लागे पर्यंत सदरचे मिळकती वरील त्यांचे जागे वहीवाटीस प्रतिवादींनी अडी हरकत किंवा अडथळा निर्माण करु नये, म्हणुन त्यांचे विरुध्द तात्पुरता मनाई हुकूम आदेश पारीत करण्यात यावा, याकरीता वादींनी दिवाणी प्रक्रीया संहिता आदेश ३९, नियम १ प्रमाणे हा अर्ज दाखल केला आहे.

३. प्रतिवादींनी नि. १८ वर त्यांचा जबाब दाखल करुन हा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

४. अर्ज व प्रतिवादींचे जबाबावरुन, हा अर्ज निकाली काढणे कामी मी खालील मुद्दे निश्चित केले आहेत व त्यावर माझा निष्कर्ष देवुन अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

| | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादींचे हक्कात प्रथम दर्शनी केस आहे काय ? | ... नाही. |
| २. | अनुकुलतेचा समतोल वादींचे हक्कात आहे काय ? | ... नाही. |
| ३. | अर्ज नामंजुर केला तर वादींचे अपरिमित नुकसान होणार आहे काय ? | ... नाही. |
| ४. | काय आदेश ? | ... अर्ज नामंजुर करण्यात येत आहे. |

**:: का र ण मि मां सा ::**

**मुद्दा क्र. १ ते ३ करीता** :

५. मनाई हुकूम आदेश पारीत करणे करीता वादींनी प्रथम दर्शनी केस त्यांचे हक्कात आहे काय, अनुकुलतेचा समतोल त्यांचे हक्कात आहे काय तसेच अर्ज नामंजुर केला तर त्यांचे अपरिमित नुकसान होईल हे तीन घटक सिध्द करणे गरजेचे आहे. या शिवाय

वादी स्वच्छ हेतुने न्यायालया समोर आलेला असणे गरजेचे आहे.

६. प्रतिवादीं तर्फे ॲड. आर. एच. कदम यांचा युक्तीवाद ऐकल्यावर मी, वाद पत्र व प्रतिवादींची लेखी कैफीयत तसेच दाव्यात दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले आहे.

७. वादींचे कथना नुसार वाद मिळकत ही मुळची राजकीय सरंजाम वतनाची मिळकत होय. वादींचे पुर्व हक्कदार पांडु पिसाळ हा वाद मिळकतीचा मालक व ताबेदार होता. वादींचा पुर्व हक्कदार दौलती पिसाळ यास घरगुती कारणा करीता आर्थिक निकड भासली होती त्यामुळे त्याने जनार्दन किरवे व रामचंद्र किरवे यांना रु. ३,०००/— किंमतीस वाद मिळकत तारण/गहाण ठेवली होती व त्याबाबत दस्त केला होता. सदरची गहाण रकमेची परतफेड करणे करीता दौलती पिसाळ याचेकडे पैसे नसल्यामुळे त्याने प्रतिवादींचा पुर्व हक्कदार वामन श्रीपती कदम याचेकडुन रु. ३,५००/— वाढीव गहाण रक्कम घेतली होती व जनार्दन तसेच रामचंद्र किरवे यांना ती रक्कम देवुन गहाण दस्त सोडवुन घेतला होता व त्यानंतर वामन कदम याचे हक्कात वाद मिळकतीचा गहाण दस्त करुन दिला होता. वादींचे असे कथन आहे की, दौलती पिसाळ याने वामन कदम याचे हक्कात जरी वाद मिळकतीचा गहाण दस्त करुन दिला होता तरी वाद मिळकतीचा ताबा वामनला दिला नव्हता.

८. वादींचे कथना नुसार सदरचे गहाण दस्ता आधारे बेकायदेशिरपणे वामन कदम याचे हक्कात वाद मिळकतीचा फेरफार

क्र. ९४९९ पारीत झाला होता व त्या आधारे त्याचे नावाची नोंद वाद मिळकतीचे महसुल अभिलेखास झाली होती. वादींचे कथना नुसार दौलती पिसाळ यास वामन कदम याचे हक्कात कसलाही दस्त करुन घेणेचा अधिकार नव्हता त्यामुळे त्या दोघां मधील व्यवहार हा बेकायदेशिर आहे. वादींचे असे कथन आहे की, वाद मिळकतीवर त्यांचा ताबा असुन प्रतिवादी हे बेकायदेशिरपणे त्यांचे ताबे वहीवाटीस अडथळा निर्माण करत असतात त्यामुळे वादींचे हक्कात तात्पुरता मनाई हुकूम आदेश पारीत करणे गरजेचे आहे.

९. प्रतिवादींचे कथना नुसार दि. २९.११.१९६७ रोजी वामन श्रीपती कदम याने दौलती पिसाळ याचे कडुन वाद मिळकत नोंदणीकृत खरेदी दस्ताने खरेदी केलेली मिळकत आहे. वामनने त्या करीता दौलतीला मोबदला दिलेला आहे. त्यामुळे वामन कदम हा वाद मिळकतीचा प्रामाणिक खरेदीदार आहे. नोंदणीकृत खरेदी दस्ता आधारे वामन कदम हा वाद मिळकतीचा मालक व ताबेदार होता. वामनचे मृत्यु नंतर त्याचे वारस म्हणुन प्रतिवादी हे मालक व ताबेदार आहेत. दौलती पिसाळ याचे हयातपणी वादींनी सन १९६७ सालचे खरेदी दस्तास कधीही आव्हान दिलेले नाही त्यामुळे हा दावा मुळातच मुदतबाहय आहे त्यामुळे हा अर्ज नामंजुर करण्यात यावा, अशी विनंती प्रतिवादींनी केलेली आहे. वादी हे स्वच्छ हेतुने न्यायालया समोर आलेले नाहीत, वाद मिळकतीवर वादींचा ताबा नसतानाही त्यावर वादींचा ताबा आहे, असे खोटे कथन वादी करत आहेत त्यामुळे हा अर्ज नामंजुर करण्यात यावा, अशी विनंती प्रतिवादींनी केली आहे.

१०. नि. ४, २१ व २६ सोबत दाखल कागदपत्रांचे काळजीपुर्वक अवलोकन केले असता, प्रथम दर्शनी असे दिसुन येत आहे की, दि. २९.११.१९६७ रोजी वादींचा पुर्व हक्कदार दौलती पिसाळ याने प्रतिवादींचा पुर्व हक्कदार वामन कदम यास वाद मिळकत नोंदणीकृत खरेदी दस्ताने विक्री केलेली आहे व त्या आधारे प्रतिवादींचे नावाची नोंद वाद मिळकतीचे महसुल अभिलेखास झालेली आहे. वाद मिळकतीचे महसुल उता—याचे तसेच विदयुत बिलाचे अवलोकन केले असता त्यावर प्रतिवादींचे नावाची या क्षणी नोंद दिसुन येत आहे.

११. प्रतिवादींचे नावाची नोंद ही नोंदणीकृत दस्ताने वाद मिळकतीस झालेली असल्याचे दिसुन येत आहे याउलट वादींचे हक्कात या क्षणी असा दस्त दिसुन येत नाही. एखादया मिळकती वरील इसमाचा ताबा हा वैध आहे की अवैध आहे हा पुराव्याचा भाग आहे, त्या इसमाचा मिळकती वरील ताबा हा अवैध असला तरी त्याचे संरक्षण होणे गरजेचे आहे, असा प्रस्थापित कायदा आहे. प्रस्तुत प्रकरणात प्रतिवादींचा वाद मिळकती वरील ताबा हा नोंदणीकृत दस्ताने असल्याचे या क्षणी दिसुन येत आहे. त्यामुळे प्रतिवादींचे ताब्याचे संरक्षण होणे गरजेचे आहे. कारण नि. २१ सोबत प्रतिवादींनी दाखल केलेल्या कागदपत्रां वरुन असे दिसुन येत आहे की, धोम पाट बंधारे विभाग या कार्यालया मार्फत कृष्णा नदीचे पाणी वाद मिळकतीस वापरण्याची प्रतिवादींना परवानगी मिळालेली आहे व प्रतिवादींनी सन २०१८ साली खरीप व रब्बीचे पिक घेतले असल्याचे दिसुन येत आहे तसेच वाद मिळकती मधुन प्रतिवादींनी किसनवीर सहकारी साखर कारखान्यास उस घातलेला असल्याचे दिसुन येत आहे. अशा

परिस्थितीत वादींचे हक्कात जर हा अर्ज मंजुर केला तर प्रतिवादींचे अपरीमित नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याउलट वादींनी हा अर्ज नामंजुर केला तर त्यांचे कशा प्रकारे नुकसान होवु शकते याबाबत कसलाही प्रथम दर्शनी पुरावा दाखल केला नसल्याचे दिसुन येत आहे.

१२. वादींचे हक्कात प्रथम दर्शनी केस दिसुन येत नाही तसेच वादींचे कसल्याही प्रकारे नुकसान होण्याची शक्यता दिसुन येत नाही. सबब, अशा परिस्थितीत मी मुद्दा क्र. १ ते ३ नकारार्थी उत्तरीत पारीत करत आहे.

**मुद्दा क्र. ४ करीता :**

१३. मुद्दा क्र. १ ते ३ नकारार्थी उत्तरीत पारीत केल्यामुळे हा अर्ज नामंजुर करण्यात येत आहे. सबब खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

**:: आ दे श ::**

१. अर्ज नामंजुर करण्यात येत आहे.

२. अर्जाचा खर्च दाव्यात समाविष्ट करावा.

ठिकाण : वाई.
दिनांक : ०३.१०.२०१९.

(व्ही. एन. गिरवलकर)
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, वाई.